Exh.No. 22

मेहकर येथील मे. दिवाणी जज्ज साहेब क.स्त.

यांचे कोर्टात.

रे.मु.नं.

८६४/२०१८

वादी

रमेश कोल्हे

प्रतिवादी

किसन कोल्हे

खालील वादी तर्फे विनंती

अर्ज की,

वरील मजकुराचा दावामध्ये मे. कोर्टाने नि.क्र. १८ ~~का~~ मंजूर झाले ना आहे. परंतु अद्यापही दुरुस्ती व दुरुस्त नक्कल केलेले देण्यात आलेली नाही. वादी ही आदेशाचे नि.क्र. १८ प्रमाणे हुकुमनाम्यात दुरुस्ती करून आहे व दुरुस्त नक्कल देत नाही.

सबब मे. कोर्टाला नम्र विनंती की, नि.क्र. १८ प्रमाणे दुरुस्ती च्या आदेशानुसार दुरुस्तीचा पारचा देऊन दुरुस्त नक्कलचे प्रिंट २० प्रमाणे आली.

अर्ज मंजूर व्हावा ही विनंती.

मेहकर

दि. २०.०६.२०२४

मंगल रमेश कोल्हे

वादी

वादी तर्फे वकील

(Adv. S.A. Shirolkar)

Order Allowed

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.06.20 16:31:01 +0530

CJJD

Rs.5 COURT FEE INDIA FIVE RUPEES 5 रु. भारत पाँच रुपये

दुरुस्त नक्कल

नेवासा येथील मे.सिव्हिल जज्ज साहेब सि.डी.

रे.मु.न. यांचे कोर्टात

८६४/२०१८ वादी

१. दिपक रमेश कोल्हे वय २४
२. अजय रमेश कोल्हे वय १९
३. विशाल रमेश कोल्हे वय अज्ञान अ.पा.क.म्हणुन जनक आई वादी नं ४
४. मंगल रमेश कोल्हे वय ३५ धंदा घरकाम व शेती सर्व रा.सुकळी खुर्द ता नेवासा जि.अहमदनगर मो नं ९७६७००६७७२

प्रतिवादी

१. किसन दशरथ कोल्हे वय ६०
२. इंदुबाई किसन कोल्हे वय ५८
३. सुरेश किसन कोल्हे वय ४०
४. कमल विलास जावळे वय ३५
५. सिंधु नंदु काकडे वय ३३ धंदा घरकाम रा.खरवंडी रोड सोनई ता नेवासा जि.अहमदनगर

प्रतिवादी नं १ते४ सर्वाचा धंदा शेती सर्व रा.सुकळी खुर्द ता नेवासा जि.अहमदनगर

दावा रुपये २०००/- विषयांची किंमत रुपये २०००/-

याकामी वादी प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटपासाठी व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाझी दावा दाखल करतात तो खालील प्रमाणे.

१. मिळकतीचे वर्णन : डि.अहमदनगर सब डि ता नेवासा पैकी मौजे सुकळी खुर्द येथील शेत जमीन

| गट नंबर | क्षेत्र | | आकार | | चर्तुसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हे | आर | रु | पैसे | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १५/३ | २ | ०१ | ३ | १० | शहर टाकळी शिव | २१,२२ २३ | १६,१७ | १३/१,१३/२ १४/१,१४/२ |
| ३१ | ० | ०४ | ० | १४ | | | | |

येणे प्रमाणे बागायत शेत जमीनी त्यामधील विहीर पाणी घेण्याचे हक्कासह झाड झुडुप दगड माती तदंगभुत वस्तुसह हक्कासह काही एक राखुन न ठेवता जाण्या येण्याच्या हक्कासह.

२. याकामी वादी व प्रतिवादी यांची दाव्याचे चालु कामापुरती वंशावळ असे ती खालील प्रमाणे

किसन
↓
इंदूबाई
↓

रमेश (मयत) | सुरेश प्र.३ | कमल प्र.४ | सिंधु प्र.५

मयत
↓
मंगल वाद .४ पत्नी
↓

दिपक | अजय | विशाल

वादी न.१ | वादी न.२ | वादी नं.३

येणे प्रमाणे वादी व प्रतिवादी यांची दाव्याचे चालु कामापुरती वंशावळ असे

३. वादीचा दावा असा आहे की वादी नं १ते३ हे सख्खे भाऊ असुन वादी नं ४ ही त्यांची जनक आई आहे.तर प्रतिवादी नं १ व २ हे वादी नं १ते३ यांचे आजी आजोबा असुन वादी नं ४ चे सासु सासरे आहेत तर प्रतिवादी नं ३ हे वादी नं १ते३ चे चुलते असुन प्रतिवादी नं ४ व ५ हया वादी नं १ते३ यांच्या आत्या आहेत.वादी नं १ते३ चे वडील रमेश हे दिनांक १६/४/२०११ रोजी मयत झालेले आहेत.वादी व प्रतिवादी यांचे एकत्र हिंदु कुटुंब होते व आहे.

४. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यापंचे वडीलोपार्जित मालकी कब्जे वहीवाटीची आहे.सदर दावा मिळकत ही प्रतिवादी नं १ यांचे नांवे असुन सदर दावा मिळकतीचे उत्पन्नाचा हिशोब हा प्रतिवादी नं १ हे पहातात.वादीचे वडील मयत झाल्या पासुन प्रतिवादी हे वादींना दावा मिळकतीतुन येणा-या उत्पन्नाचा हिशोब देत नाही.वादीने तारीख ४/१०/२०२८ रोजी प्रतिवादी नं १ यांना दावा मिळकतीत असणारा त्याचा अविभक्त हिस्सा वाटुन विभागुन मागितला असता व उत्पन्नाचा हिशोब मागितला असता प्रतिवादी नं १ यांनी वादीस त्याचा दावा मिळकतीत असलेला अविभक्त हिस्सा वाटुन देण्याचे नाकारले व हिशोबही दिला नाही व दावा मिळकतीचे प्रतिवादी नं ४ व ५ यांचे नांवे हस्तांतरण करण्याची व विकुन टाकण्याची धमकी दिली.त्यावेळी वादीने प्रतिवादीस नातेवाईका मार्फत समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी वादीस म्हणाला की मी तुला जमीन वाअुन देत नाही,तुला प्रतिवादी वादीस म्हणाला की मी तुला जमीन वाअुन देत नाही,तुला काय करायचे ते कर असे म्हणुन वादीची टाळाटाळ केली व दावा मिळकतीत असलेला वादीचा अविभक्त हिस्सा वाटुन देण्याचे स्पष्टपणे नाकारले.त्यामुळे वादीस सदरचा दावा वाटपासाठी व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल करणे भाग पडले आहे.

५. दाव्यास कारण : दि.४/१०/२०१८ रोजी दावा मिळकतीत असलेला वादीचा अविभक्त हिस्सा प्रतिवादी यास वाअुन विभागुन मागितला असता प्रतिवादी यांनी वादीस टाळाटाळ करुन हिस्सा देण्याचे नाकारले त्यावेळी प्रथम दाव्यास कारण घडले आहे व त्यानंतर नित्य दिनी दाव्यास कारण घडत आहे.

६. कोर्ट अधिकार : वादी प्रतिवादी व दावा मिळकत तसेच दाव्यास घडलेले कारण या मे कोर्टाच्या न्याय सिमेतील असल्याने सदरचा दावा चालविण्याचा या मे कोर्टास पूर्ण हक्क व अधिकार आहे.

७. कोर्ट फी स्टॅम्प :दावा हा सरस निरस मानाने वाटपासाठी व निरंतर ताकीद मनाइर हुकुमासाठी असल्याने दाव्यास योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावला आहे.

वकील फी प्रोसेस व मे कोर्टाचे अधिकारासाठी विषयाची किंमत रुपये २०००/- केली आहे.

८. या वादी व प्रतिवादी यांच्यात दुसरा कोणताही दावा कोणत्याही कोटा्रत या दावा मिळकती विषयी चालु नाही.

९. वादीची विनंती

अ. वरील कथनास अनुसरुन वादीचा दावा मिळकतीत असलेला अविभक्त हिस्सा अगर मे कोर्ट ठरवतील तो हिस्सा वादीस सरस निरस मानाने वाटुन विभागुन कब्जात देववावा.

ब. प्रतिवादी नं १ ने दावा मिळकती त्यांच्या नांवावर असल्याचा गैरपुायदा घेवुन दावा मिळकतीचे इ्तर कुणासही कोणत्याही प्रकारे खरेदी.विक्री,बक्षीसपत्र लिज,लिन विसार पावती अगर वित्तीय संस्थेचे अगर बॅकेचे बोजे निर्माण करु नये असा निरंतर ताकीद मनाई हुकुम प्रतिवादी विरुध्द देववावा.

क. इ्तर योग्य ते न्यायाचह ुकुम वादीचे लाभांत व्हावेत ही विनंती.

ड. जरुर पडल्यास वादीला दावा दुरुस्तीची परवानगी असावी.

इ. या दाव्याचा खर्च वादीस प्रतिवादी कडुन देण्यात यावा ही विनंती.

येणे प्रमाणे वादीचा दावा असे

दावा दुरुस्त तारीख २०/६/२०२५

मंगल रमेश कोल्हे

वादी

पक्षकाराने सांगितलेल्या माहीती वरुन व

दाखविल्या कागदपत्रा वरुन वरील दाव्याचा

मसुदा तयार केला असे.

वादी तर्फे ॲड.(पी.व्ही.नाईक)

याकामी मी वादी नं ४ मंगल रमेश कोल्हे वय ३५ धंदा शेती घरकाम रा.सुकळी खुर्द ता नेवासा जि अहमदनगर स्वत:साठी व वादी नं३ ची अ.पाक सत्य प्रतिज्ञे वर खरे सांगते की दाव्यातील कलम १ते८ मधील संपूर्ण मजकुर व माहीती माझ्या माहीती नुसार खरी व बरोबर असुन त्याचे खरेपणासाठी मी आज रोजी या दाव्याखाली सही केली असे

दुरुस्त तारीख २०/६/२०२५ मंगल रमेश कोल्हे

वादी